# प्रकरण सहावे

# प्रकरण सहावे

## वित्तीय प्रशासनाबाबतीत अधिकारी वर्ग व जनतेच्या प्रतिक्रिया

**प्रस्तावना**

मागील प्रकरणातून आम्ही सातारा नगरपालिकेने तिच्या कार्यक्षेत्रात पार पाडलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा, नगरपालिकेच्या वित्तीय स्त्रोतांचे विवेचन याशिवाय सातारा नगरपालिकेच्या अंदाजपत्रकांच्या मदतीने नगरपालिकेने वित्तीय स्त्रोतांच्या आधाराने मिळवलेला निधी आणि केलेल्या खर्चाच्या विविध प्रकारचे विवेचन केलेले आहे. या प्रकरणात एकूण सातारा नगरपालिकेची प्रतिमा तिच्या कारकिर्दीबाबत कशी आहे. याचे विवेचन प्रशासकीय अधिकारी वर्ग व जनतेकडून मिळालेल्या माहितीतून करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सातारा नगरपालिकेतील २७ लोकप्रतिनिधी आणि १० प्रशासकीय अधिकारी म्हणजे एकूण ३७ व्यक्तिंकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावरून सातारा नगरपालिकेची प्रतिमा स्पष्ट होऊ शकते.

**तक्ता क्र. ६.१**

**सातारा नगरपालिकेने दुर्लक्ष केलेली क्षेत्रे ***

| अ.क्र. | दुर्लक्ष केलेली क्षेत्रे | प्रशासकीय अधिकारी | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | अंडरग्रांऊड ड्रेनेज | ०३ | ०६ | ०९ |
| २. | रस्ते रूंदीकरण | ०३ | ०२ | ०५ |
| ३. | पाणी पुरवठा | – | ०१ | ०१ |
| ४. | पार्किंग | – | ०१ | ०१ |
| ५. | सांडपाणी व्यवस्था | – | ०२ | ०२ |
| ६. | महिला व बालकल्याण | – | ०१ | ०१ |
| ७. | शिक्षण | – | ०१ | ०१ |
| ८. | दुर्लक्ष केले नाही | ०६ | १४ | २० |
| ९. | निरंक | – | ०२ | ०२ |
| | एकूण | १२ | ३० | ४२ |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, सातारा नगरपालिकेने कोणत्याही क्षेत्राकडे दुर्लक्ष केलेले नाही असे मत १४ लोकप्रतिनिधी तर ६ प्रशासकीय अधिकारी वर्गाचे आहे. तर एकूण ६ लोकप्रतिनिधी आणि ३ अधिकारी वर्गाने अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टीमकडे दुर्लक्ष झाले आहे असे मत मांडले आहे. त्यानंतर रस्ते रूंदीकरण हे क्षेत्र दुर्लक्षित राहिले आहे असे ५ व्यक्तींनी नमूद केलेले आहे. इतर कार्यक्षेत्रांबद्दल मत दर्शविण्यासाठी अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी इच्छा दर्शविली नाही. याचा अर्थ म्हणजे बहुतेक वरील क्षेत्राबद्दल अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधी दोहोंनीही कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत जास्तीत जास्त दुर्लक्ष केल्याची शक्यता आहे. संशोधनार्थी स्वत: नगरपालिकेच्या कक्षेत वास्तव्य करीत असून वरील कार्यक्रमाचे अवलोकन करत असता असे स्पष्ट झाले की, शिक्षण क्षेत्र सोडून इतर क्षेत्रात जास्त हलगर्जीपणा दिसून येतो.

**तक्ता क्र. ६.२**

**सद्यपरिस्थितीत गरजेचे काम***

| अ.क्र. | सद्यपरिस्थितीत गरजेचे काम | अधिकारी वर्ग | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | भुयारी गटर योजना | ०४ | १५ | १९ |
| २. | शाळेसाठी सुविधा | – | ०१ | ०१ |
| ३. | सांडपाणी व्यवस्था | ०१ | ०४ | ०५ |
| ४. | सार्वजनिक शौचालये | – | ०१ | ०१ |
| ५. | कचरा विल्हेवाट | – | ०१ | ०१ |
| ६. | रस्ते रूंदीकरण | – | ०६ | ०६ |
| ७. | पार्कींग सुविधा | ०४ | ०२ | ०६ |
| ८. | पिण्याचे पाणी वितरण | ०१ | ०९ | १० |
| ९. | उत्पन्नवाढ | ०१ | – | ०१ |
| १०. | अग्निशमन व्यवस्था | ०१ | – | ०१ |
| | एकूण | ३९ | १२ | ५१ |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील तक्त्यावरून सातारा शहरात भुयारी गटर योजना, पिण्याचे पाणी वितरण, पार्किंग सुविधा, सांडपाणी व्यवस्था सद्यपरिस्थितीत गरजेच्या आहेत असे यांनी सांगितले आहे. परंतू

इतर गोष्टींबद्दल अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी जास्त महत्व दिले नाही किंवा देत नाहीत हे स्पष्ट हेते. अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी असे मत मांडले आहे की, नगरपालिकेकडे इतर कामांचा व्याप जास्त आहे आणि सर्व कामे व्यवस्थितरितीने पार पाडण्यासाठी निधी अपुरे पडतात. उदा. पाणीपुरवठा आणि अंडरग्राऊंड ड्रेनेज कामासाठी निधी फार अपुरा पडतो. काही कामांसाठी मंजूरी अद्यापही मिळाली नाही. म्हणून काही कामांची कार्यवाही होत नाही.

**तक्ता क्र. ६.३**

**भविष्यकाळात लक्ष द्यावे अशी कामे***

| अ.क्र. | कामे | अधिकारी वर्ग | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण क्षेत्र | ०१ | ०३ | ०४ |
| २. | पाणी पुरवठा | ०३ | १० | १३ |
| ३. | रस्ते | ०१ | ०६ | ०७ |
| ४. | अंडरग्राऊंड ड्रेनेज | ०४ | ०९ | १३ |
| ५. | सार्वजनिक आरोग्य | ०१ | – | ०१ |
| ६. | पार्किंग | – | ०३ | ०३ |
| ७. | अग्निशमन | ०१ | – | ०१ |
| ८. | सांडपाणी | – | ०५ | ०५ |
| ९. | कचरा विल्हेवाट | – | ०३ | ०३ |
| १०. | उत्तर लिहीले नाही. | ०४ | ०२ | ०६ |
| | एकूण | १५ | ४१ | ५६ |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील तक्त्यावरून पाणीपुरवठा आणि अंडरग्राऊंड ड्रेनेज योजनेला सातारा नगरपालिकेने नजीकच्या भविष्यकाळात अधिक लक्ष दयावे हे स्पष्ट होते. आतापर्यंत सातारा नगरपालिकेने कोणत्या कार्यक्षेत्राकडे दुर्लक्ष केले त्याचे कारण आणि कोणती कार्ये नजीकच्या भविष्यकाळात महत्त्वाची आहेत याची माहिती घेतली आहे. आता नगरपालिका अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींचे अंदाजपत्रकाबद्दल काय मत आहे हे पाहूया.

### तक्ता क्र. ६.४

### अंदाजपत्रक प्रक्रियेत समाविष्ट गोष्टी *

| अ.क्र. | समविष्ट गोष्टी | अधिकारी वर्ग | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग | ०१ | – | ०१ |
| २. | लोकसंख्या | ०१ | – | ०१ |
| ३. | सर्वांना समान न्याय | ०१ | ०७ | ०८ |
| ४. | विकास | ०९ | ०१ | १० |
| ५. | उत्पन्न | ०६ | ०७ | १३ |
| ६. | शासकिय अनुदाने | ०५ | ०४ | ०९ |
| ७. | खर्च | ०३ | ०१ | ०४ |
| ८. | महत्त्वाची विकास कामे | – | ०५ | ०५ |
| ९. | सर्व सामान्यांच्या गरजा | – | ०६ | ०६ |
| १०. | उत्तर लिहीले नाही. | ०२ | ०४ | ०६ |
| | एकूण | २८ | ३५ | ६३ |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील तक्त्यावरून हे समजते की, नगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी नगरपालिकेचे उत्पन्न, विकास, शासकिय अनुदान व सर्वांना समान न्याय या गोष्टींचा विचार केला जातो अशी मते मांडलेली आहेत. परंतू अधिकारी वर्ग वगळता वरील गोष्टींबद्दल नगरपालिकेचे लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर अनभिज्ञ आहेत आणि त्यांनी सतर्क होण्यासाठी आजूबाजूच्या नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधी व अधिकारी वर्गाशी मिसळून विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी, नगरपालिकेचे उत्पन्न व विकास करण्यासाठी वर्षाला एकतरी कार्यशाळेचे आयोजन करणे आवश्यक आहे.

मागील वर्षाच्या (२००७-०८) अंदाजपत्रकाबाबत मत विचारल्यास ४ अधिकारी आणि १३ लोकप्रतिनिधींनी समाधानकारक आहे असे म्हटलेले आहे परंतु ३ अधिकाऱ्यांनी त्यांचे असमाधान व्यक्त केलेले आहे. एकूण २७ लोकप्रतिनिधींनी नगरपालिकेतून त्यांना लागणाऱ्या प्रशासकीय कामकाजाबद्दल माहिती नगरपालिकेतून मिळते असा विचार व्यक्त केला आहे. म्हणजे नगरपालिकेच्या कारभारात काही प्रमाणात पारदर्शकता आहे हे स्पष्ट होते.

### तक्ता क्र. ६.५

### कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती

| अ.क्र. | उत्तर | अधिकारी वर्ग | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | होय | ०८ | २७ | ३५ |
| २. | उत्तर दिले नाही. | ०२ | – | ०२ |
| | एकूण | १० | २७ | ३७ |

नगरपालिकेस तिला सोपवलेली जबाबदारी व कार्यक्रम व्यवस्थितरित्या आणि पूर्णपणे पार पाडण्यासाठी निधीची गरज असते. नगरपालिकेला असे निधी वेगवेगळ्या स्त्रोतांतून मिळवून कार्यभार पार पाडावा लागतो. निधीचा एक महत्वाचा स्त्रोत म्हणजे नगरपालिकेने लादलेले विविध कर होय. असे कर वसूल करणे वसुली कर्मचारी वर्गाची जबाबदारी आहे. नगरपालिकेचे कर वसुल करणारा कर्मचारी वर्ग सोपवलेली कामे वेळेवर पार पाडतात असे ०८ अधिकारी आणि २७ लोकप्रतिनिधींनी म्हटलेले आहे. परंतु वस्तुस्थितीत मागील प्रकरणात थकबाकीसंबंधित तक्ते आणि लेखापरिक्षकांच्या अहवालामधून सुस्पष्ट होते की, मोठ्या प्रमाणात थकबाकी असून लेखापरिक्षकांनी त्यांच्या अहवालात वारंवार थकबाकी वसूल करण्याबद्दल नगरपालिकेला सूचना दिलेल्या दिसतात. म्हणजे करवसुलीबद्दल प्रत्यक्षात हलगर्जीपणा केलेला आहे आणि याबद्दल काटेकोर दक्षता घेणे आवश्यक आहे.

### तक्ता क्र. ६.६

### थकबाकीची कारणे *

| अ.क्र. | थकबाकीची कारणे | अधिकारी | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. | ०३ | ०४ | ०७ |
| २. | समान घरपट्टी आकार नाही | – | ०१ | ०१ |
| ३. | लोकांमध्ये दुर्लक्ष आहे | ०४ | ०५ | ०९ |
| ४. | वसुली होत नाही | – | ०५ | ०५ |
| ५. | उत्तर लिहीले नाही. | ०३ | १५ | १८ |
| | एकूण | १० | ३० | ४० |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत, असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील तक्त्यामध्ये सातारा नगरपालिकेचे थकबाकी असण्याचे मुख्य कारणाविषयी प्रशासकीय अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधी यांनी असे सांगितले की, अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत आणि अनेक नागरिक कर भरणे जाणीवपूर्वक टाळतात आणि वसुलीदेखील होत नाही असे मत व्यक्त केले आहे.

**तक्ता क्र. ६.७**

**थकबाकीदार वर्ग**

| अ.क्र. | थकबाकीदार वर्ग | अधिकारी | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमंत वर्ग | ०१ | १० | ११ |
| २. | मध्यम वर्ग | ०३ | ०७ | १० |
| ३. | गरीब वर्ग | ०३ | ०७ | १० |
| ४. | सांगता येत नाही | ०१ | - | ०१ |
| ५. | उत्तर दिले नाही. | ०२ | ०३ | ०५ |
| | एकूण | १० | २७ | ३७ |

वरील तक्त्यावरून सातारा नगरपालिकेत थकबाकीदार वर्गात मोठ्या प्रमाणात श्रीमंत आणि मध्यम वर्ग असून गरीब वर्ग तुलनेने कमी आहे. ही प्रवृत्ती फक्त सातारा नगरपालिकेपुरती मर्यादित नसून संपूर्ण देशात ही प्रवृत्ती पसरलेली आहे आणि थकबाकीदारांवर कडक कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारी नोकरवर्गाने कोणत्याही आशा-अमिषाला किंवा दबावाला बळी न पडता त्यांना दिलेले अधिकार निर्भिडपणे वापरून त्यांची जबाबदारी सक्षमरितीने पार पाडण्याची गरज आहे. सातारा नगरपालिकेत थकबाकी वसूल करण्यासाठी कडक कारवाई केली का आणि केल्यास कोणत्या स्वरूपाची कारवाई केली याबद्दल पुढील तक्त्यावरून माहिती मिळते.

**तक्ता क्र. ६.८ (अ) आणि (ब)**

**थकबाकीसाठी कार्यवाही आणि स्वरूप ***

**(अ)**

| अ.क्र. | उत्तरे | अधिकारी | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | होय | ०७ | २६ | ३३ |
| २. | उत्तर दिले नाही | ०३ | ०१ | ०४ |
| | एकूण | १० | २७ | ३७ |

(ब)

| अ.क्र. | स्वरूप | अधिकारी | लोकप्रतिनिधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | जप्ती | ०८ | २२ | ३० |
| २. | उशिरा कर भरणाऱ्यांना व्याज | ०१ | – | ०१ |
| ३. | पाणी पुरवठा बंद करणे | ०२ | ०४ | ०६ |
| ४. | लायसेन्स जप्त करणे | – | ०१ | ०१ |
| | एकूण | ११ | २७ | ३८ |

* शोधप्रबंधासाठी एकूण ३७ अधिकारी (१०) व लोकप्रतिनिधी (२७) यांच्याकडून माहिती मिळवली. परंतू उत्तर देत असताना एकापेक्षा अधिक उत्तरे दिल्यामुळे बेरजेमध्ये फरक दिसतो.

वरील (अ) तक्त्यामध्ये सातारा नगरपालिकेची थकबाकी वसूल करण्यासाठी कारवाई केली का या विषयी प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची उत्तरे पुढीलप्रमाणे आहेत. एकूण ३३ व्यक्तींनी थकबाकी वसूल करण्यासाठी कारवाई केली जाते असे सांगीतले आहे. त्याचप्रमाणे वरील (ब) तक्त्यावरून थकबाकी वसूल करण्यासाठी जप्ती, पाणी पुरवठा बंद करणे, लायसेन्स जप्त करणे, उशीरा कर भरणाऱ्यांना त्याचे व्याज भरावयास लावणे असे मार्ग वापरल्याचे स्पष्ट होते.

सातारा नगरपालिकेतील प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या नगरपालिकेच्या कारभाराबद्दल प्रतिक्रियांचे आपण विवेचन केले. आता सातारा नगरपालिकेच्या कक्षेतील एकूण ९२ नागरिकांची मते पुढील तक्त्यांच्या आधारे जाणून घेऊया.

**तक्ता क्र. ६.९**

**नगरपालिकेने केलेली समाधानकारक कामे ***

| अ.क्र. | समाधानकारक कामे | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण | २१ | १३ | १३ | ४७ |
| २. | बांधकाम | ०५ | ०२ | ०४ | ११ |
| ३. | पाणीपुरवठा | २५ | ०७ | १३ | ४५ |
| ४. | आरोग्य स्वच्छता | ०९ | ०६ | ०६ | २१ |
| ५. | महिला बालकल्याण | ०६ | ०९ | ०५ | २० |
| | एकूण | ६६ | ३७ | ४१ | १४४ |

* शोध निबंधासाठी एकूण ९२ नागरिकांकडून मते मिळवलेली आहेत. प्रश्नाला उत्तर देताना एका व्यक्तीने एकापेक्षा जास्त क्षेत्रांचा उल्लेख केल्यामुळे बेरजेत फरक जाणवतो.

वरील तक्ता सातारा नगरपालिकेने कोणत्या क्षेत्रांत समाधानकारक कामे केली आहेत याविषयी सर्वसामान्य नागरिकांची मते दर्शवितो. सातारा शहरातील शिक्षण, पाणी पुरवठा विभागांबाबत नागरिक अधिक समाधानी आहेत. तसेत आरोग्य व स्वच्छता आणि महिला व बालकल्याणाबाबतसुद्धा समाधानी आहेत. परंतू नगरपालिकेच्या बांधकाम म्हणजे रस्ते, गटार, पार्कींगच्या सुविधा याबद्दल असंतोष व्यक्त केलेला आहे. या दोन्ही बाबींबद्दल अधिक लक्ष घालणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. ६.१० (अ) आणि (ब)**
**नगरपालिकेने दुर्लक्षित क्षेत्रे आणि त्याची कारणे ***

**(अ)**

| अ.क्र. | दुर्लक्षित क्षेत्रे | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ६. | शिक्षण | १० | ०२ | ०६ | १८ |
| ७. | बांधकाम | १३ | ०६ | ०९ | २८ |
| ८. | पाणीपुरवठा | ११ | १३ | ०३ | २७ |
| ९. | आरोग्य स्वच्छता | २६ | ११ | १४ | ५१ |
| १०. | महिला बालकल्याण | ०५ | ०६ | ०८ | १९ |
| | एकूण | ६५ | ३८ | ४० | १४३ |

**(ब)**

| अ.क्र. | दुर्लक्षित क्षेत्रे | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नियोजनाचा अभाव | ०७ | ०५ | ०५ | १७ |
| २. | कर्मचाऱ्यांची कमतरता | ०५ | – | ०१ | ०६ |
| ३. | अपुरा निधी | ०३ | – | – | ०३ |
| ४. | नागरीकांची उदासिनता | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ५. | कर्मचाऱ्यांचा नकारात्मक दृष्टीकोन | ०४ | – | – | ०४ |
| ६. | अकार्यक्षम कर्मचारी वर्ग | ०२ | – | – | ०२ |
| ७. | सेवाभावी वृत्तीचा अभाव | ०१ | – | – | ०१ |
| ८. | अधिकाऱ्यांचे बेजबाबदार वर्तन | ०७ | – | – | ०७ |
| ९. | राजकारण | ०४ | – | – | ०४ |
| १०. | भ्रष्टाचार | ०४ | ०४ | – | ०८ |
| ११. | पदाधिकारी व प्रतिनिधी वाद | ०१ | – | – | ०१ |
| १२. | लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष | ०१ | ०२ | ०२ | ०५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | शहराची भौगोलिक रचना | ०२ | | ०१ | ०३ |
| १४. | नगरसेवकांचा कार्यकाल कमी | – | ०१ | – | ०१ |
| | एकूण | ४२ | १३ | १० | ६५ |

* शोध निबंधासाठी एकूण ९२ नागरिकांकडून मते मिळवलेली आहेत. प्रश्नाला उत्तर देताना एका व्यक्तीने एकापेक्षा जास्त क्षेत्राचा उल्लेख केल्यामुळे बेरजेत फरक जाणवतो.

वरील (अ) तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, आरोग्य व स्वच्छता क्षेत्र अधिक दुर्लक्षित आहे. बांधकाम आणि पाणीपुरवठा क्षेत्रातदेखील लक्षणिय दुर्लक्ष झालेले दिसते. महिला व बालकल्याण आणि शिक्षण क्षेत्राच्या कार्याबद्दल लोक समाधानी आहेत हे स्पष्ट होते.

वरील (ब) तक्त्यामध्ये सातारा नगरपालिकेच्या दुर्लक्षित राहिलेल्या क्षेत्रांविषयीच्या कारणांमधील नियोजनाचा अभाव, भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांचे बेजबाबदार वर्तन, कर्मचाऱ्यांची कमतरता आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष ही महत्त्वाची असून याबद्दल उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ६.११ (अ) आणि (ब)**

**नगरपालिकेतील भ्रष्टाचार आणि त्याची क्षेत्रे**

**(अ)**

| अ.क्र. | उत्तरे | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | होय | १९ | १६ | २१ | ५६ |
| २. | नाही | १७ | ०७ | ०८ | ३२ |
| ३. | सांगता येत नाही | – | ०४ | – | ०४ |
| | एकूण | ३६ | २७ | २९ | ९२ |

**(ब)**

| अ.क्र. | भ्रष्टाचाराची क्षेत्रे | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण | ०७ | ०५ | ०५ | १७ |
| २. | बांधकाम | २२ | ०९ | १९ | ५० |
| ३. | पाणी पुरवठा | ०४ | ०४ | ०१ | ०९ |
| ४. | स्वच्छता व आरोग्य | ०५ | ०३ | ०४ | १२ |
| ५. | महिला व बालकल्याण | ०३ | – | ०१ | ०४ |
| | एकूण | ४१ | २१ | ३० | ९२ |

वरील (अ) तक्त्यामध्ये सातारा नगरपालिकेत भ्रष्टाचार होतो हे स्पष्ट होते कारण एकूण ९२ नागरिकांपैकी ५६ नागरिकांनी भ्रष्टाचार होतो हे मत स्विकारलेले आहे. वरील (ब) तक्त्याप्रमाणे सातारा नगरपालिकेत होणारा भ्रष्टाचार प्रामुख्याने बांधकाम, शिक्षण आणि स्वच्छता व आरोग्य या विभागात होतो हे स्पष्ट होते. उरलेल्या क्षेत्रात याचे प्रमाण तुलनेने कमी आहे असे दिसते.

भ्रष्टाचारातील कोणाचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे किंवा कोणत्या घटकाचे भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त आहे यासाठी पुढील तक्त्यामधून माहिती घेऊया.

**तक्ता क्र. ६.१२**

**भ्रष्टाचारात समाविष्ट व्यक्ती ***

| अ.क्र. | भ्रष्टाराचात समाविष्ट व्यक्ती | नोकरी | गृहिणी | इतर व्यावसायिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | राजकारणी | ०३ | ०१ | ०७ | ११ |
| २. | नोकर | ०४ | ०१ | ०२ | ०७ |
| ३. | राजकारणी + नोकर | १७ | १० | १२ | ३९ |
| ४. | नोकर + कनिष्ठ कर्मचारी | ०८ | ०५ | ०५ | १८ |
| | एकूण | ३२ | १७ | २६ | ७५ |

* शोधनिबंधासाठी एकूण ९२ नागरिकांची मते मिळवली आहेत. प्रश्नांची उत्तरे देताना काही व्यक्तींनी एकापेक्षा जास्त उत्तरे दिली आहेत तर काही व्यक्तींनी उत्तर देण्याचे टाळले आहे. त्यामुळे बेरजेत फरक दिसतो.

वरील तक्त्यामध्ये सातारा नगरपालिकेमध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारामध्ये राजकारणींचा वाटा जास्त असला तरीसुद्धा राजकारणी आणि नोकरवर्ग एकत्रितरित्या भ्रष्टाचारात समाविष्ट आहेत. परंतू प्रशासकीय नोकर आणि कनिष्ठ कर्मचारी एकत्रित होऊन भ्रष्टाचार कमी प्रमाणात करतात हेसुद्धा स्पष्ट होते. भ्रष्टाचार टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबद्दलची माहिती तक्ता क्र. ६.१३ दर्शवितो.

## तक्ता क्र. ६.१३

### भ्रष्टाचारात टाळण्यासाठी उपाययोजना *

| अ.क्र. | उपाययोजना | नोकरी | गृहिणी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | नागरिकांनी लाच न देणे | ०२ | ०३ | – | ०५ |
| २. | नगरसेवकांचे नि:स्वार्थी स्वच्छ वर्तन | ०२ | ०७ | ०५ | १४ |
| ३. | पारदर्शक प्रशासन | ०८ | ०९ | ०६ | २३ |
| ४. | नागरिकांची जागरुकता | ०७ | ०४ | ०३ | १४ |
| ५. | प्रत्येक कामाचे योग्य मूल्यमापन | – | – | ०५ | ०५ |
| ६. | राजकीय हस्तक्षेप नको | ०१ | – | ०२ | ०३ |
| ७. | भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई | ०५ | – | ०२ | ०७ |
| ८. | चांगल्या वर्तनाची दखल | ०१ | – | ०१ | ०२ |
| ९. | योग्य नियोजन | ०४ | – | ०१ | ०५ |
| | एकूण | ३० | २३ | २५ | ७८ |

* शोधनिबंधासाठी एकूण ९२ नागरिकांची मते मिळवली आहेत. प्रश्नांची उत्तरे देताना काही व्यक्तींनी एकापेक्षा जास्त उत्तरे दिली आहेत तर काही व्यक्तींनी उत्तर देण्याचे टाळले आहे. त्यामुळे बेरजेत फरक दिसतो.

वरील तक्त्यावरुन एक विचार स्पष्ट होतो तो म्हणजे सर्वसामान्य नागरिकांनी नगरपालिकेतील भ्रष्टाचार टाळण्यासाठी दिलेल्या सल्ल्यात एकसारखेपणा दिसत नाही परंतू वरील सर्व सल्ले अत्यंत उपयुक्त म्हणावयास हरकत नाही. वरील सल्ल्यांमधील नागरिकांनी पारदर्शक प्रशासन, नगरसेवकांचे नि:स्वार्थी, स्वच्छ वर्तन आणि नागरिकांची जागरुकता याबद्दल जास्त भर दिलेला आहे, हे ठळकपणे दिसते.

## तक्ता क्र. ६.१४

### नवीन क्षेत्रे व त्याची कारणे *

| अ.क्र. | नवीन क्षेत्र आणि त्याची कारणे | नोकरी | गृहिणी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | माहिती तंत्रज्ञान क्षेत्र<br>कारण–काळाची गरज | ०७ | ०६ | ०१ | १४ |
| २. | उच्चशिक्षणाची सोय<br>कारण–सर्वसामान्यांच्या सोयीसाठी | १४ | ०६ | ०५ | २५ |
| ३. | क्रिडाक्षेत्र<br>कारण–खेडाळूंना प्रोत्साहन | ०३ | ०५ | ०४ | १२ |
| ४. | औद्योगिक क्षेत्र<br>कारण–रोजगाराच्या संधी निर्माण होतील | १४ | ०६ | ०५ | २५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | महानगरपालिका होण्यासाठी प्रयत्न<br>कारण-इतर उपनगरे त्यात समाविष्ट होतील | ०८ | ०१ | ०१ | १० |
| ६. | सुसज्ज रस्ते, उड्डाण पूल, पार्कींग<br>कारण-वाहतूक सुविधा | १४ | ०१ | ०६ | २१ |
| ७. | बागा, उद्याने निर्मिती<br>कारण-लहान मुलांची सोय | ०४ | ०३ | ०१ | ०८ |
| ८. | वैद्यकीय क्षेत्रात सुधारणा<br>कारण-गरजूंसाठी उपयुक्त | ०१ | - | - | ०१ |
| ९. | आरोग्य व स्वच्छताक्षेत्र<br>कारण-सार्वजनिक हितासाठी गरज | १२ | ०२ | ०५ | १९ |
| १० | वृक्षारोपण, सुशोभिकरण<br>कारण-स्वच्छ सुंदर सातारा होण्यासाठी | ११ | ०१ | ०९ | २१ |
| ११ | जुन्या ऐतिहासिक वास्तुंचे जतन<br>कारण-पर्यटन स्थळ होण्यासाठी | ०१ | - | ०२ | ०३ |
| १२ | कलाक्षेत्र<br>कारण-कलावंतांना प्रोत्साहन | - | ०२ | ०३ | ०५ |
| १३ | वॉर्डनिहाय समस्यानिवारण केंद्र<br>कारण-प्रभावी प्रशासन | - | - | ०३ | ०३ |
| | एकूण | ३० | २३ | २५ | ७८ |

वरील तक्त्यावरुन सातारा नगरपालिकेने कोणत्या नवीन क्षेत्रात पदार्पण करावे त्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांची मते तक्ता क्रमांक ६.१४ तून स्पष्ट होतात. सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सातारा नगरपालिकेने सातारा शहरातच उच्च शिक्षणाची सोय करावी, आणि स्थानिक बेरोजगारांचा रोजगाराचा प्रश्न सुटण्याच्या हेतूने सातारा नगरपालिकेने औद्योगिक क्षेत्रात पदार्पण करावे असे विचार मांडलेले आहेत. तद्नंतर साताऱ्यातील वाहतूकीच्या कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी उड्डाणपूल निर्मिती, रस्ते रुंदीकरण इत्यादी गोष्टी निर्माण करण्याची अपेक्षा करतात. तसेच, सातारा शहर स्वच्छ व सुंदर होण्यासाठी बागांचे, आयलँड्सचे तसेच शहराचे सुशोभिकरण व वृक्षारोपणावर भर द्यावा अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करतात, नगरपालिकेने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य असणाऱ्या आरोग्य व स्वच्छता या विभागाकडे अधिक लक्ष द्यावे, तसेच आजच्या काळाची गरज म्हणून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पदार्पण करावे आणि सातारा शहरातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी क्रिडा क्षेत्रात अधिक

कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या माहितीच्या अनुषंगाने असा निष्कर्ष काढता येतो की शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आपल्या नगरपालिका प्रशासनाकडून बऱ्याच अपेक्षा आहेत की ज्या सातारा नगरपालिकेने लक्षात घेणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ६.१५**

**नगरपालिकेकडून अपेक्षा ***

| अ.क्र. | अपेक्षित प्रशासन | नोकरी | गृहिणी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छ प्रशासन | २१ | १० | १४ | ४५ |
| २. | किफायतशीर प्रशासन | ०१ | ०१ | ०३ | ०५ |
| ३. | परिणामकारक स्वरुपाचे प्रशासन | २२ | १४ | १४ | ५० |
| | एकूण | ४४ | २५ | ३१ | १०० |

* शोधनिबंधासाठी एकूण ९२ नागरिकांची मते मिळवली आहेत. प्रश्नांची उत्तरे देताना काही व्यक्तींनी एकापेक्षा जास्त उत्तरे दिली आहेत तर काही व्यक्तींनी उत्तर देण्याचे टाळले आहे. त्यामुळे बेरजेत फरक दिसतो.

वरील तक्त्यामध्ये सातारा शहरातील नागरिकांची सातारा नगरपालिकेकडून स्वच्छ आणि परिणामकारक प्रशासनाची अपेक्षा आहे हे स्पष्ट होते.

**संदर्भ** - क्षेत्र अध्ययन